# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. महमंद इकबाल एस. शेख
बी. १६, कुमार प्रिमियर हौसिंग सोसायटी,
७४५, भवानी पेठ, पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, साखर भवन,
शिवाजीनगर, पुणे - ५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उपनिबंधक,
सहकारी संस्था (शहर-२), साखर भवन,
शिवाजीनगर, पुणे - ५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३५३ / २००९ / पुणे |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ०७.०८.२००९ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - सहकारी गृहनिर्माण संस्थेवरील प्रशासकाच्या कार्यकालातील दरमहा सभेचे इतिवृत्त, वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त, व संस्थेचे नफातोटा पत्रक (ताळेबंद) इ: | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. महमंद इकबाल एस. शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय व विहीत मुद्रांक शुल्क (रु. २०/-) इ.

कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**स्थळ :- पुणे**
**दि. ३० - ११ - २००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंत निवृत्तीनाथ गाडवे पाटील
मु.पो.कामशेत, ता.मावळ, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, पुरंदर, ता.पुरंदर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
पुरंदर, ता.पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३५४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.४.२००९ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वसंत निवृत्तीनाथ गाडवे पाटील
मु.पो.कामशेत, ता.मावळ, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
पुरंदर, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.एस.व्ही.चंदनशिवे

४ **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**

माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे.

## विवेचन

सन १९९३ च्या खरेदीखताबाबत आपण मागितलेली माहिती विहित मुदतीत मिळाली नाही. त्याबाबत टाळाटाळ करण्यात आली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.वसंत निवृत्तीनाथ गाडवे पाटील यांनी आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात केली आहे. मंडल अधिकारी, जेजुरी यांनी आपल्याला वेळोवेळी बोलावून आपल्या मागणीबाबत माहिती विचारली. परंतु कागदपत्रे दिली नाहीत, वारंवार बोलावण्याचे कारण कळावे, अशी मागणी श्री.गाडवे पाटील यांनी केली.

श्री.गाडवे पाटील यांनी सन १९८५ ते एप्रिल २००९ या काळातील माहिती मागणीचा अर्ज मंडल अधिकारी, जेजुरी यांच्याकडे केला होता. ते जन माहिती अधिकारी नव्हते. निवासी नायब तहसीलदार जन माहिती अधिकारी होते व त्यांच्याकडे श्री.गाडवे पाटील यांनी अर्ज केलेला नव्हता. जन माहिती अधिकाऱ्यांनी आपल्या कक्षेतील माहिती दिली. ऊर्वरित माहिती दुय्यम निबंधक, पुरंदर यांच्याकडील होती. दुय्यम निबंधकांना तसे पत्र दिले. दुय्यम निबंधक, पुरंदर यांनी सन १९९२-९३ च्या संबंधित दस्तऐवजाच्या प्रती श्री.गाडवे पाटील यांना पाठविल्याचे दि.१२.५.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पुरंदर श्री.एस.व्ही.चंदनशिवे यांनी नमूद केले.

मंडल अधिकारी, जेजुरी यांनी संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज वर्ग करणे आवश्यक होते. तथापि माहिती मिळवून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ११ .११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

सौ. रंजना शिवाजी जगदाळे
मु. पो. मलवडी, ता. माण, जि. सातारा — **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसिलदार माण,
ता. माण जि. सातारा — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायाब तहसिलदार,
तहसिलदार कार्यालय, ता. माण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६७ / २००९ / सातारा |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.४.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१.६.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.७.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.८.२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** -<br>अपीलकर्त्यांने अपिलासोबत आवश्यक शुल्क व आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. | |

**विवेचन**

अपीलकर्त्या सौ. रंजना शिवाजी जगदाळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व विहित मुद्रांक शुल्क रु. (२०/-) जोडले नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ :- पुणे**
**दि.२३-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

सौ. रंजना शिवाजी जगदाळे
मु. पो. मलवडी, ता. माण, जि. सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसिलदार माण,
ता. माण जि. सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायाब तहसिलदार,
तहसिलदार कार्यालय, ता. माण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६७ / २००९ / सातारा |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.४.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१.६.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.७.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.८.२००९ |
| ६ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>** -<br>अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक शुल्क व आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्त्या सौ. रंजना शिवाजी जगदाळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व विहित मुद्रांक शुल्क रु. (२०/-) जोडले नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ :- पुणे**
**दि.२३-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. प्रशांत प्रभाकर जाखलेकर
१४७ / २, रेल्वे लाईन, धनशीला को-ऑप. हौसिंग सोसायटी, **अपीलकर्ता**
जुन्या आर. टी. ओ. ऑफिसजवळ, सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** मुख्य महाव्यवस्थापक, **उत्तरवादी**
स्टेट बँक ऑफ इंडीया, लोकल हेड ऑफिस सिनर्जी ,
प्लॉट नं. सी-६ जी ब्लॉक बांद्रा कुर्ला कॉम्लेक्स,
बांद्रा (ईस्ट), मुंबई - ५१

**जन माहिती अधिकारी तथा** सहायक महाप्रबंधक,/ क्षेत्रिय महाव्यवस्थापक,
स्टेट बँक ऑफ इंडीया, क्षेत्रिय व्यवसाय कार्यालय,
आशीष कॉम्लेक्स असेंब्ली रोड, शाहूपूरी, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** सहायक महाव्यवस्थापक, क्षेत्र - २
स्टेट बँक ऑफ इंडीया, स्टेट बँक कार्यालय, गुलमोहर, //२४२, ईस्ट स्ट्रीट,
पुणे ४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३७२ /सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.१०.२००८ व २०.१०.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.१०.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.११.२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.१२.२००८ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. प्रशांत प्रभाकर जाखलेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे ज्या सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निर्णयाविरुध्द अपील केले आहे, ते सार्वजनिक प्राधिकारण हे केंद्रिय माहिती आयोगाच्या कार्यकक्षेतील असल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करता येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. मनजित सिंग मिन्हास — अपीलकर्ता
प्लॉट नं.४, निलकंठ को.ऑप.हौ.सोसायटी,
बॉम्बे शॉपर्स कॉलनी, वडगांवशेरी, पुणे-१४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा — सहाय्यक कामगार आयुक्त,
कामगार उप आयुक्त यांचे कार्यालयख मुंबई पुणे
रस्ता, बंगला नं.५, शिवाजीनगर, पुणे-५ — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा — सरकारी कामगार अधिकारी, कामगार उप आयुक्त
यांचे कार्यालय, मुंबई पुणे रस्ता, बंगला नं.५,
शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३९१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.१०.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. मनजित सिंग मिन्हास<br>प्लॉट नं.४, निलकंठ को.ऑप.हौ.सोसायटी,<br>बॉम्बे शॉपर्स कॉलनी, वडगांवशेरी, पुणे-१४ |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | सहाय्यक कामगार आयुक्त,<br>कामगार उप आयुक्त यांचे कार्यालयख मुंबई पुणे<br>रस्ता, बंगला नं.५, शिवाजीनगर, पुणे-५ |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | सरकारी कामगार अधिकारी, कामगार उप आयुक्त<br>यांचे कार्यालय, मुंबई पुणे रस्ता, बंगला नं.५,<br>शिवाजीनगर, पुणे-५ |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.९.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.१०.२००७ |
| ८ | माहिती मागणीचा मूळ अर्ज (जोडपत्र-अ) ची प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

आपल्याला माहिती देण्यात आलेली नाही, तसेच टाटा मोटर्स लि., पिंपरी / पुणे या कंपनीत आपल्याला पूर्वत कामावर घेण्याच्या मागणीबाबत योग्य ती कार्यवाही केली गेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. मनजीत सिंग सिन्हास यांनी केली आहे. श्री. मिन्हास यांना त्यांच्या तक्रारीबाबत वेळोवेळी माहिती देण्यात आली आहे. पूर्वत कामावर घेण्याची व त्या अनुषंगाने टाटा मोटर्स लि., च्या व्यवस्थापनावर कारवाई करण्याची त्यांची मागणी हा प्रशासकीय कार्यवाहीचा भाग असून त्याबाबतच्या अपिलाची सुनावणी करून अपील निकाली काढले आहे. संबंधित प्रकरण सध्या कामगार न्यायालयात पाठविले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, कामगार उप आयुक्त कार्यालय श्री. अे.अे. कुंभार यांनी नमूद केले. ही माहिती आपल्याला तोंडी सांगितली. परंतु लेखी मिळावी, अशी मागणी श्री. मिन्हास यांनी केली. ती देण्यात यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार त्याच दिवशी श्री. मिन्हास यांना अपील निर्णयाची प्रत देण्यात आली, असा अहवाल आयोगाच्या विचारणेनंतर अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, पुणे श्री. बी. व्ही.वाघ यांनी त्याबाबतचा अहवाल दि. २३.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगास सादर केला. अहवाल सादर करण्यास असा विलंब होणे ही गंभीर बाब असून त्याबाबत अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, पुणे श्री. बी. व्ही.वाघ यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३० .११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्यां कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्रीमती पुष्पा मारुती कापसे यांच्यावतीने
श्री. शिवाजी आनंदा कापसे (अधिकारपत्राने) **अपीलकर्ता**
जुना बुधवार पेठ, डांगे गल्ली पाठीमागची बाजू
घ. नं. २६४६, डी वॉर्ड, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रशासन अधिकारी, **उत्तरवादी**
प्राथमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर महानगरपालिका,

**जन माहिती अधिकारी तथा** कनिष्ठ प्रशासन अधिकारी,
प्राथमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर महानगरपालिका,

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३९८ / २००९ / कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.६.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.७.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.७.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.९.२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - माहिती-मागणी अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. शिवाजी आनंदा कापसे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. त्रयस्थ पक्षाची कागदपत्रे जोडली असून मूळ अर्ज व प्रथम अपील करणाऱ्या व्यक्तीच्या अधिकारपत्राने राज्य माहिती आयोगाकडे अपील करण्याची तरतूद माहितीचा

अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही केली जाणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

पुणे
दि. २७-११-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. शिवाजी आनंदा कापसे (अधिकारपत्राने)
श्रीमती पुष्पा मारुती कापसे यांच्यावतीने
जुना बुधवार पेठ, डांगे गल्ली पाठीमागची बाजू
घ. नं. २६४६ डी वॉर्ड, कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप सचिव,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३९९ / २००९ / कोल्हापूर |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | निरंक (दि. १५.५.२००९ रोजी प्राप्त) |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.५.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.९.२००९ |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>** - माहिती-मागणी अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. शिवाजी आनंदा कापसे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. ही त्रयस्थ पक्षाची कागदपत्रे जोडली असून मूळ माहिती-मागणी अर्ज व प्रथम अपील करणाऱ्या व्यक्तीच्या अधिकारपत्राने राज्य माहिती आयोगाकडे अपील करण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नाही. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही केली जाणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७- ११ -२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विकास भिमराव गायकवाड
मु.पो.वडापुरी, ता.इंदापूर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी
पंचायत समिती, हवेली, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१०.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. विकास भिमराव गायकवाड
मु.पो.वडापुरी, ता.इंदापूर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी
पंचायत समिती, हवेली, जि. पुणे श्री. विक्रांत बगाडे

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, हवेली, जि.पुणे
श्री. एस.व्ही. अभंग

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.५.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.६.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.९.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.९.२००७ |
| | | |

## विवेचन

आपण दारिद्र्य रेषेखालील दाखला दिला असून जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती, हवेली यांच्याकडून मागितलेली माहिती मिळत नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. विकास भिमराव गायकवाड यांनी केले.

श्री. गायकवाड यांनी चार वर्षांची माहिती मागितली असून कागदपत्रांच्या छायांकित प्रती काढण्यासाठी दहा ते पंधरा हजार रूपये खर्च येईल, कार्यालयाला एवढा खर्च शक्य नसल्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे त्यासाठी अनुदानाची मागणी केली आहे. दरम्यान अपीलकर्त्याचा दारिद्र्य रेषेखालील दाखला रद्द झाला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती, हवेली श्री. एस.व्ही.अभंग यांनी केले.

अपीलकर्त्यास अभिलेखांचे अवलोकन निःशुल्क करू द्यावे व मागणीनुसार आवश्यक त्या प्रती नियमातील तरतुदीनुसार द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री. गायकवाड यांना रजिस्टर्ड टपालाने पत्र पाठवून अभिलेख अवलोकनासाठी कळविले होते. परंतु ते आलेले नाहीत, असे जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, (बांधकाम विभाग), पंचायत समिती, हवेली उपविभाग, जिल्हा परिषद, पुणे यांनी दि. २७.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप ज्ञानेश्वर ओरपे
संपादक, रयतेचा राजा, कळसगाव,
मारूती मंदिरासमोर, पुणे १५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, प्रादेशिक मनोरूग्णालय,
येरवडा, पुणे-६ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
प्रादेशिक मनोरूग्णालय, येरवडा, पुणे-६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप ज्ञानेश्वर ओरपे
संपादक, रयतेचा राजा, कळसगाव, मारूती मंदिरासमोर, पुणे १५

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
प्रादेशिक मनोरूग्णालय, येरवडा, पुंणे-६ श्री.एस.एस.वाघेला

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.१०.२००७, दि.१.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.----- |

| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>माहिती मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी त्याच तारखेला घेण्यात आली.

आपण केलेल्या अर्जानंतर जन माहिती अधिकाऱ्याकडून कोणतेही उत्तर न आल्यामुळे तीन स्मरणपत्रे पाठवून अपील केले. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, प्रादेशिक मनोरूग्णालय, येरवडा, पुणे यांनी अपिलाची दखल घेतली नाही. संबंधितांना शास्ती करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.दिलीप ज्ञानेश्वर ओरपे यांनी केली.

श्री.ओरपे यांनी मागितलेली माहिती सार्वजनिक बांधकाम खाते व अन्य विभागाकडून घ्यावयाची होती. विस्तृत माहिती संकलित करावी लागणार असल्यामुळे विलंब लागेल, याची कल्पना श्री.ओरपे यांना दिली होती. मूळ अर्ज दि.२२.८.२००७ चा असून माहिती संकलित केल्यावर दि.१९.१०.२००७ रोजी व दि.१.११.२००७ रोजी शुल्क कळविले होते. माहिती देऊ केली असता त्यांनी स्वीकारण्यास नकार दिला. दरम्यानच्या काळात श्री.ओरपे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, प्रादेशिक मनोरूग्णालय, येरवडा, पुणे यांच्याकडे अपील केले. माहिती देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे विलंब क्षमापित करावा, अशी विनंती जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, प्रादेशिक मनोरूग्णालय, येरवडा, पुणे श्री.एस.एस.वाघेला यांनी केली.

श्री.ओरपे यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित लिपिकांना माहिती संकलनाबाबतचे आदेश आपण दिले होते. परंतु आपली बदली होईपर्यंत माहिती संकलित होऊन न मिळाल्यामुळे आपल्याला देता आली नाही, असा लेखी खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, प्रादेशिक मनोरूग्णालय, येरवडा, पुणे श्रीमती जे.व्ही.मंडले यांनी केला.

जन माहिती अधिकाऱ्यांची विनंती मान्य करून विलंब क्षमापित करण्यात येत आहे. मात्र संपूर्ण माहिती अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२५.११.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. सुरेश सदाशिव अंबुरे
१३१, तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
भीमा कालवा मंडळ, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा
सहायक अधीक्षक अभियंता,
भीमा कालवा मंडळ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५४ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.०४.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. सुरेश सदाशिव अंबुरे<br>१३१, तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** - अधीक्षक अभियंता, भीमा कालवा मंडळ, सोलापूर<br>श्री.रविंद्र प्र. लांडेकर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा :-** सहायक अधीक्षक अभियंता, भीमा कालवा मंडळ, सोलापूर<br>श्री. अ. रा. पैलवान | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.२.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | ---- |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br><br>कारंबा शाखा कालव्यातून पाणी प्रवाह पध्दतीने एकरूख पंपगृह टप्पा - १ पर्यंत आणणेसाठी करावयाच्या कालवा खोदाईचे काम सध्या अस्तित्वातअसलेली एकरूख पंपगृह ठप्पा १ व २ बांधकाम निविदेअंतर्गत करून घेण्यासाठी मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावातील प्रदेश कार्यालयास सादर केलेले पत्र जा. क्र. भीकामं / प्रशा/ एकरूख / सिंयो/ १०५०/ २००८ दि. ८.२.२००८ व विभागीय कार्यालयाचे पत्र क्र. उकावि ८ /प्रशा - २/ एकरूख / ८३३/०८ दि ८.२.२००८ सोबतच्या प्रस्तावाची प्रत. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुरेश सदाशिव अंबुरे यांनी भीमा कालवा मंडळाकडून एकरूख पंपगृह बांधकामाबाबत अधीक्षक अभियंता कार्यालयाने पाठविलेला दि. ८.२.२००८ चा प्रस्ताव व त्यास विभागीय कार्यालय (मुख्य अभियंता (विप्र), जलसंपदा, पुणे) ने दिलेल्या मंजुरीची प्रत जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, भीमा कालवा मंडळ सोलापूर यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर माहिती मिळत नसल्याने श्री. अंबुरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. १६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने त्याच दिवशी सुनावणी घेण्यात आली.

जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता यांनी उपलब्ध माहिती घेऊन जाण्यास अपिलकर्ते श्री. अंबुरे यांना दूरध्वनीवरून संपर्क साधून कळविले. तसेच दि. २४.४.२००९ रोजी पत्र दिले असता दि. २७.४.२००९ रोजी माहिती अपूर्ण असल्याचे सांगून अपिलकर्त्याने माहिती स्वीकारण्यास नकार दिला, असे जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, भीमा कालवा मंडळ, सोलापूर यांनी दि. ३०.४.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. मूळ प्रस्ताव न देता आपल्याला केवळ सोबतचे पत्र दिले जात आहे, असे श्री. अंबुरे यांनी आयोगाला सादर केलेल्या विविध निवेदनांमध्ये म्हटले आहे. असा वेगळा प्रस्ताव पाठविला होता का,याबाबत सबंधितांना पाठविलेली पत्रे व त्यांची उत्तरे यांच्या प्रतीसह खुलासा जन माहिती अधिकारी यांच्याकडून व माहिती न स्वीकारल्याबद्दल अपिलकर्त्याकडून खुलाशाची मागणी आयोगाने केली.

अशाप्रकारे कोणताही प्रस्ताव नसून सबंधित पत्रान्वयेच परवानगी घेण्यात आली होती, असे जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता भीमा कालवा मंडळ, सोलापूर श्री. अ. रा.पैलवान यांनी दि. १५.६.२००९ च्या पत्रान्वये

आयोगास कळविले. जे कागदपत्र प्रत्यक्षात नाहीत त्याबाबत काल्पनिक व प्रश्नार्थक मुद्दा उपस्थित करून संशोधन करून खुलासा करण्याची अपीलकर्त्याची मागणी आहे, असेही त्यांनी त्यांच्या लेखी निवेदनात म्हटले आहे. आपण मागणी करीत असलेला प्रस्ताव २.५ ते ३ कोटी रूपयांचा आहे. एवढया मोठया कामाला केवळ फॉरवर्डींग पत्रान्वयेच मान्यता दिली गेली का ?, असा प्रश्न अपिलकर्ता श्री. अंबुरे यांनी स्थानिक पातळीपासून राज्यपाल, मुख्यमंत्री आदीपर्यंत विविध पातळयांवर व आयोगाकडील केलेल्या पत्रव्यवहारात उपस्थित केलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील तो विषय नाही. दि.१.६.२००९ च्या पत्रामध्ये केवळ प्रस्तावामध्ये फॉरवर्डिंग पत्र देत असल्याचे नमूद करून माहिती स्वीकारत नसल्याचे नमूद केले आहे. अपीलकर्त्याची ही कृती माहिती न स्वीकारल्या समान आहे व ती योग्य नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ६ .११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलमं १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.उदय मधुकर नाईक
वेदांत रेसिडेंटल कॉम्प्लेक्स, डी-२/५०२, पोखरण रोड नं.१,
वर्तकनगर, ठाणे(प.)४००६०६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
विश्वकर्मा इन्स्टिटयूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी,
स.नं.२/३/४, कोंढवा बु., पुणे-४८

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
विश्वकर्मा इन्स्टिटयूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी,
स.नं.२/३/४, कोंढवा बु., पुणे-४८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.उदय मधुकर नाईक
वेदांत रेसिडेंटल कॉम्प्लेक्स, डी-२/५०२, पोखरण रोड नं.१,
वर्तकनगर, ठाणे(प.)४००६०६

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी, विश्वकर्मा इन्स्टिटयूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, स.नं.२/३/४, कोंढवा बु., पुणे-४८ श्री.मं.ज.खुर्जेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. — |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. — |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.१७.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मागितलेली माहिती विलंबाने, अपुरी व चुकीची दिली गेली. प्रा.शैलेश जे. थावरे यांना व्हीआयआयटी, पुणे येथे नोकरी करीत असताना पुणे येथील ब्राइट अॅकेडेमीमध्ये शिकविण्याची परवानगी दिली होती का, याबाबतची सत्य माहिती व व परवानगीची प्रत मिळालेली नाही, असे निवेदन अपीलकर्ता श्री.उदय मधुकर नाईक यांनी केले.

श्री.नाईक यानी समक्ष माहिती नेणार असल्याचे नमूद केले होते. त्यामुळे टपालाने माहिती पाठविली नाही. ते विलंबाने येऊन माहिती घेऊन गेले. ब्राइट अॅकेडेमीमध्ये प्रा.थावरे यांनी फक्त आठ तासिका (लेक्चर्स) घेतल्या असून त्याबाबत त्यांना तोंडी परवानगी दिली असल्याचे उत्तर दिले आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, कोंढवा बु., पुणे यांनी केले. श्री.नाइक यांची मुलगी कु.धनश्री उदय नाईक हिने संस्थेत प्रवेश घेऊन आवश्यक ते शैक्षणिक शुल्क भरलेले नाही. तरीही तिचा प्रवेश कायम करण्यासाठी दबावाचा मार्ग म्हणून ते माहितीच्या अधिकाराचा वापर करीत आहेत. मुंबई उच्च न्यायालयात त्यांनी याच अनुषंगाने दाखल केलेल्या याचिकेत संस्थेच्या एका प्राध्यापकांना त्यानी प्रतिवादी केले होते. ती याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा माहिती

अधिकारी, विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, कोंढवा बु., पुणे श्री.मं.ज.खुर्जेकर व अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, कोंढवा बु., पुणे श्री.ए.एस.तबीलदार यांनी लेखी निवेदनात नमूद केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे, मात्र व्यक्तिशः माहिती नेणार असल्याचे नमूद केले असले तरी माहिती तयार असल्याचे व शुल्काबाबत अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी श्री.मं.ज.खुर्जेकर यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२७.११.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.तानाजी हरिभाऊ यादव
मु.पो.ता.बेलवाडी, व्हाया भवानीनगर, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा साखर आयुक्त, पुणे विभाग,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा साखर आयुक्त, पुणे विभाग,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७०९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.तानाजी हरिभाऊ यादव
मु.पो.ता.बेलवाडी, व्हाया भवानीनगर, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.८.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.७.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांपैकी कोणीही हजर न झाल्याने दि.२६.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

छत्रपती सहकारी साखर कारखाना मर्यादित, भवानीनगर, ता.इंदापूर, जि.पुणे या कारखान्याचे संचालक माहिती देण्यास टाळाटाळ करतात. कारखान्याचे तत्कालीन कार्यकारी संचालक श्री.के.आर.पवार यांनी घेतलेला नियमबाह्य पगार आदिची रक्कम २५ लाखांच्या आसपास आहे. लेखापरीक्षण, नियुक्त्या आदिंबाबत साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे तक्रार करूनही कारवाई केली गेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.तानाजी हरिभाऊ यादव यांनी केली.

श्री.यादव यांनी कारखान्यात गैरव्यवहार असल्याची तक्रार दि.२५.१०.२००७ रोजी अर्जान्वये केली होती. त्याबाबत चौकशी करण्यात आली व त्यांनी मागितलेली माहिती वेळोवेळी त्यांना देण्यात आली. प्रथम अपिलामध्येही श्री.यादव यांना याबाबतची संपूर्ण माहिती देण्यात आली, असे लेखी निवेदन प्रादेशिक सहसंचालक, साखर, पुणे विभाग, पुणे यांनी पूरक कागदपत्रांसह आयोगाला सादर केले. आपण केलेल्या तक्रारीबाबत फेरचौकशी करण्याचे आदेश साखर आयुक्त, पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी द्यावेत, अशी मागणी श्री.यादव

यांनी दि.२६.११.२००८ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. तथापि हा प्रशासकीय कार्यवाहीविषयक भाग आहे. अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७.११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री.इब्राहिम इस्माईल तडकल **अपीलकर्ता**
६५२, साखर पेठ, सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड, जि. नांदेड **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड, जि. नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०.११.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड, जि. नांदेड श्री. अ.क्ष.पवार<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड, जि. नांदेड तर्फे प्रतिनिधी श्री. एम. डी. पाटील | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती मागणीचा मूळ अर्ज (जोडपत्र-अ) ची प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. १८.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २०.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडील रिट याचिकेच्या संदर्भात अपीलकर्ता श्री.इब्राहिम इस्माईल तडकल यांनी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे माहिती मागितली होती. या याचिकेची प्रत आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यामुळे माहिती देता आली नाही. उच्च न्यायालयाकडे या प्रतीची मागणी दि.८.१.२००७ च्या पत्रान्वये केली आहे, परंतु ती प्राप्त झालेली नसल्यामुळे देता आली नाही. अपिलीय प्राधिकारी यांच्याकडील सुनावणीला श्री. तडकल उपस्थित नव्हते. त्यांच्या अर्जातील स्पष्टीकरण मागणाऱ्या मुद्दयांचे उत्तर दिले नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांचे प्रतिनिधी श्री. एम.डी. पाटील व अपिलीय प्राधिकारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड श्री. अ. श. पवार यांनी पूरक कागदपत्रांसह लेखी व तोंडी नमूद केले. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३० .११.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. राजेंद्र रामचंद्र इंगवले — अपीलकर्ता
राहुल चेंबर्स, १४, एरंडवणे, कर्वे रोड,
पुणे-४११ ००४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मुळशी
ता. मुळशी, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तलाठी भूगांव,
ता. मूळशी, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५२४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. राजेंद्र रामचंद्र इंगवले
राहुल चेंबर्स, १४, एरंडवणे, कर्वे रोड, पुणे-४११ ००४

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मुळशी
ता. मुळशी, जि. पुणे प्रतिनिधी श्री. विकास भालेराव निवासी नायब तहसीलदार

**जन माहिती अधिकारी** तथा तलाठी भूगांव,
ता. मूळशी, जि. पुणे श्री. दिलीप गणपतराव सुर्यवंशी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.१२.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

फेर फार क्र.४६७७ ची नोंदणी कार्यवाही करताना संबंधित घटकांचे घेतलेले जबाबाच्या नकला व शासकीय निर्णयाची छायांकित प्रत, व दुययम निबंधकांकडून प्राप्त अपत्र व सहपत्राची छायांकित प्रत व कार्यवाहीचा तपशीलवार अहवाल

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमा त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २१.१०.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

फेरफाराच्या संदर्भातील जाबजबाब आदी दस्तांच्या प्रती आपण मागितल्या होत्या. ती माहिती न देता दुसरीच दिली. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, मुळशी यांच्या निर्णयानंतरही माहिती मिळाली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. राजेंद्र रामचंद्र इंगवले यांनी केले.

झालेल्या फेरफार नोंदीची प्रत श्री. इंगवले यांना देण्यात आली. अशा फेरफाराबाबत जाबजबाब घेतले जात नाहीत, त्यामुळे ती माहिती मुळातच नसल्याने देता आली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, भूगाव, ता. मूळशी श्री. दिलीप गणपतराव सुर्यवंशी यांनी केले.

श्री. इंगवले यांना सर्व माहिती मुदतीत देण्यात आली. त्या व्यतिरिक्त काही माहिती हवी असल्यास द्यावी, असा आदेश प्रथम अपिलावर दिला, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, मूळशी यांचे प्रतिनिधी श्री. विकास भालेराव यांनी नमूद केले.

फेरफार प्रकरणी जाबजबाब घेतले नसतील तर अपीलकर्त्यास तसे लेखी कळवावे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी श्री. एल. जी. गांजे यांनी दहा दिवसांत लेखी खुलासा आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

श्री. गांजे यांनी दि.२७.१०.२००८ रोजी खुलासा सादर केला. 'मौजे भूगाव, ता. मुळशी, जि. पुणे येथे कामगार तलाठी, भूगाव या पदावर कार्यरत असताना मला दुय्यम निबंधक, मुळशी (पौड) ता. मुळशी यांचेकडून प्राप्त झालेल्या अ-विवरण पत्रकावरुन नोंद गा.न.नं. ६-ड ला घेऊन

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १५० (२) अन्वये सुचना नोटीस संबंधित लिहून देणार यांना देऊन नोंदीची सूचना नोटीस मिळालेबाबत नोटीस बुकावर समक्ष सही घेतलेली आहे व मंडल अधिकारी, थेरगांव, ता.मुळशी यांनी फेरफार नोंदी तपासणीचे वेळी हक्कनोंदणीचे प्रचलित नियमानुसार विहित मुदतीचा कालावधी पुर्ण झालेने फेरफार नोंद क्र.४६७७ मंजूर केलेने त्यानुसार मंजुर फेरफाराचा अंमल सातबारा उताऱ्यावर देण्यात आलेला आहे, असे त्यांनी खुलाशात नमूद केले आहे.

श्री. गांजे यांनी पूर्वी केलेल्या भ्रष्टाचारानुसारच्या कागदपत्रांच्या प्रती देऊन खोटी माहिती दिली आहे, अशी तक्रार श्री. इंगवले यांनी दि. १५.११.२००८ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. परंतु मूळ कागदपत्रांनुसार माहिती देण्यात आली असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. याबाबत भ्रष्टाचार झाल्याची अपीलकर्त्याची तक्रार असल्यास योग्य त्या न्यायासनाकडे दाद मागण्याचा मार्ग त्यांना मोकळा आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६ .११.२००९**